**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य खंडपीठ, पुणे यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार**

तक्रार क्रमांक - ( यादी प्रमाणे )

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे-१

तक्रारदार श्री दत्तात्रय चतुर्भुज माने यांनी राज्य माहिती आयोगाकडे कलम १८ अंतर्गत सोबत विवरण पत्रात नमूद केल्याप्रमाणे एकूण २२ तक्रार अर्ज दाखल केले आहेत. तक्रारदार यांनी केलेल्या तक्रार अर्जाची तपासणी केली असता हे तक्रार अर्ज प्रामुख्याने कलम ६ अन्वये माहिती अर्ज करून कलम १८ अन्वये तक्रार अर्ज अशा प्रकारे केले असल्याचे दिसून आले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने, मुख्य माहिती आयुक्त व इतर विरुद्ध मणिपूर राज्य सरकार, सिव्हील अपील क्र. १०७८७-१०७८८/२०११ या प्रकरणी दि. १२.१२.२०११ रोजी दिलेल्या न्याय निर्णयामध्ये कलम १८ ची प्रक्रिया स्पष्ट केली आहे. तसेच या आदेशाच्या परिच्छेद ३५ मध्ये असे स्पष्ट केले आहे की, अपिलार्थी/ तक्रारदार यांनी माहिती मिळविण्यासाठी कायद्याने ठरवून दिल्यानुसार कलम १९ मधील विहित केलेल्या अपील प्रक्रिये नुसार आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक आहे. तसेच ज्या माहिती अर्जाच्या संदर्भात कलम १९(३) अन्वये आयोगास द्वितीय अपील सादर करण्यात आले आहे व ज्या अपील प्रकरणी आयोगाने पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही, अशा प्रकरणी तक्रारदार यांनी कलम १८ अंतर्गत तक्रार दाखल करणे अपेक्षित आहे.

तक्रारदार यांनी आयोगाकडे सादर केलेल्या तक्रार अर्जाची तपासणी केली असता या सर्व तक्रार प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कलम १९ मधील विहित केलेल्या अपील प्रक्रियेचा अवलंब न करता व मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश विचारात न घेता आयोगाकडे कलम १८ अंतर्गत तक्रारी दाखल केल्या आहेत असे स्पष्ट होत आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्देश विचारात घेता तक्रारदार यांनी कलम १८ अंतर्गत दाखल केलेल्या २२ तक्रारी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाशी सुसंगत नसल्याने, या तक्रारी विना कार्यवाही निकाली काढण्यास पात्र आहेत या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. सबब आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

तक्रारदार यांचे २२ तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ पुणे.

तक्रार क्रमांक - ( यादी प्रमाणे ) जावक.क्र - ९५२१/२०२५ दिनांक- १/१०/२०२५

तक्रारदाराचे नाव - दत्तात्रय चतुर्भुज माने

| अनु. क्र | तक्रार क्रमांक | वर्ष | संबंधित जिल्हा | तक्रार दाखल दिनांक | जन माहिती अधिकारी पदनाम | जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1826 | 2024 | पुणे | 09.12.2024 | नायब तहसिलदार (महसूल) | विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 799 | 2023 | पुणे | 14.09.2023 | बांधकाम विकास विभाग झोन क्र. १ | पुणे महानगरपालिका, पुणे ५ |
| 3 | 798 | 2023 | पुणे | 14.09.2023 | बांधकाम विकास विभाग झोन क्र. १ | पुणे महानगरपालिका, पुणे ५ |
| 4 | 796 | 2023 | पुणे | 14.09.2023 | बांधकाम विकास विभाग झोन क्र. १ | पुणे महानगरपालिका, पुणे ५ |
| 5 | 793 | 2023 | पुणे | 14.09.2023 | बांधकाम विकास विभाग झोन क्र. १ | पुणे महानगरपालिका, पुणे ५ |
| 6 | 794 | 2023 | पुणे | 14.09.2023 | बांधकाम विकास विभाग झोन क्र. १ | पुणे महानगरपालिका, पुणे ५ |
| 7 | 795 | 2023 | पुणे | 14.09.2023 | बांधकाम विकास विभाग झोन क्र. १ | पुणे महानगरपालिका, पुणे ५ |
| 8 | 801 | 2023 | पुणे | 14.09.2023 | बांधकाम विकास विभाग झोन क्र. १ | पुणे महानगरपालिका, पुणे ५ |
| 9 | 802 | 2023 | पुणे | 14.09.2023 | बांधकाम विकास विभाग झोन क्र. १ | पुणे महानगरपालिका, पुणे ५ |
| 10 | 1832 | 2024 | पुणे | 24.12.2024 | उपअभियंता | बांधकाम विकास विभाग झोन कं. १ पुणे महानगरपालिका पुणे ०५ |
| 11 | 1831 | 2024 | पुणे | 24.12.2024 | उपअभियंता | बांधकाम विकास विभाग झोन कं. १ पुणे महानगरपालिका पुणे ०५ |
| 12 | 1829 | 2024 | पुणे | 24.12.2024 | उपअभियंता | बांधकाम विकास विभाग झोन कं. १ पुणे महानगरपालिका पुणे ०५ |
| 13 | 1830 | 2024 | पुणे | 24.12.2024 | उपअभियंता | बांधकाम विकास विभाग झोन कं. १ पुणे महानगरपालिका पुणे ०५ |
| 14 | 1837 | 2024 | पुणे | 24.12.2024 | अवल कारकून (अपील शाखा) | जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे |
| 15 | 1835 | 2024 | पुणे | 24.12.2024 | अवल कारकून (अपील शाखा) | जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे |
| 16 | 1833 | 2024 | पुणे | 24.12.2024 | अवल कारकून (अपील शाखा) | जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे |
| 17 | 1834 | 2024 | पुणे | 24.12.2024 | अवल कारकून (अपील शाखा) | जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे |
| 18 | 1836 | 2024 | पुणे | 24.12.2024 | अवल कारकून (अपील शाखा) | जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे |
| 19 | 1828 | 2024 | पुणे | 24.12.2024 | अवल कारकून (अपील शाखा) | जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे |
| 20 | 1827 | 2024 | पुणे | 24.12.2024 | अवल कारकून (अपील शाखा) | जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे |
| 21 | 800 | 2023 | पुणे | 14.09.2023 | कक्ष अधिकारी | पुणे महानगरपालिका, पुणे ५ |
| 22 | 797 | 2023 | पुणे | 14.09.2023 | कक्ष अधिकारी | पुणे महानगरपालिका, पुणे ५ |

*******

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
पुणे खंडपीठ